जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

दुरध्वनी क्र.02452-222644 - फॅक्स क्र.02452-223774 - ई-मेल - dpo.pbn@gmail.com

संदर्भ :- 1. महाराष्ट्र शासन, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र.जिवायो 1007/प्र.क्र.39/का-1444, दि.16 फेब्रुवारी, 2008

2. सार्वजनिक आरोग्य विभागाचा शासन निर्णय क्र.अर्थसं-2016/प्र.क्र.158/अर्थसंकल्प, दि.28.9.2016

3. उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळ, औरंगाबाद यांचे तांत्रिक मान्यता आदेश पत्र क्र.उसंआसे/भांडार/औ.बाद, दि.20.06.2018

4. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, परभणी यांचे पत्र क्र.जिरुप/औ.भां./डिपीडिसी/12509-05, दि.03.09.2018

5. जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, परभणी यांचे पत्र क्र.जिरुप/औ.भां./डिपीडिसी/16462-64, दि.03.11.2018

जा.क्र.जिनिस/जिवायो-18-19/शल्यचिकित्सक/प्र.मा./नि.वि./.का.क्र.1/2080 दि.15 नोव्हेंबर, 2018

## जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) 2018 -19 अंतर्गत प्रशासकीय मान्यता व निधी वितरण आदेश

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन 2018-19 या वित्तीय वर्षामध्ये उपजिल्हा रुग्णालयासाठी औषधे, साहित्य व साधनसामग्रीची खरेदी करणे व ग्रामीण रुग्णालयासाठी औषधे, साहित्य व साधनसामग्रीची खरेदी करणे या योजनेंतर्गत अनुक्रमे रु.60.00 लक्ष व रु.40.00 लक्ष मंजूर असून अनुक्रमे रु.42.00 लक्ष व रु.28.00 लक्ष निधी या कार्यालयाचे BDS वर उपलब्ध झालेली आहे.

जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, परभणी यांनी संदर्भ क्र.4 व 5 अन्वये खालील परिशिष्टात दर्शविल्याप्रमाणे योजनानिहाय प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यास अधिन राहुन व संदर्भिय शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी जिल्हाधिकारी, परभणी या आदेशान्वये खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून खालील तपशिलाप्रमाणे **रु.9.98 लक्ष (अक्षरी रुपये नऊ लक्ष अठ्ठयान्नव हजार फक्त)** च्या रकमेस प्रशासकीय मान्यता देवून निधी वितरित करण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| अ. क्र. | योजनेचे नांव | मंजूर तरतूद | BDS वर उपलब्ध निधी | प्रशासकीय मान्यता किंमत | आता वितरित करावयाचा निधी | लेखाशिर्ष O - 50 |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | उप जिल्हा रुग्णालयासाठी औषधे, साहित्य व साधनसामग्रीची खरेदी करणे. | 60.00 | 42.00 | 5.99 | 5.99 | 2210 - वैदयकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य - इतर वैदयकीय पध्दती 800 - इतर खर्च, (49) - जिल्हा योजना- परभणी (49)(04) उप जिल्हा रुग्णालयासाठी औषधे, साहित्य व साधनसामग्रीची खरेदी करणे. **(2210 E713)** 21- पुरवठा व सामग्री |
| 2 | ग्रामीण रुग्णालयासाठी औषधे, साहित्य व साधनसामग्रीची खरेदी करणे. | 40.00 | 28.00 | 3.99 | 3.99 | 2210 - वैदयकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य - इतर वैदयकीय पध्दती, 800 - इतर खर्च, (49) - जिल्हा योजना- परभणी, (49)(04) उप जिल्हा रुग्णालयासाठी औषधे, साहित्य व साधनसामग्रीची खरेदी करणे. **(2210 8049)** 21- पुरवठा व सामग्री |
| | **एकूण** | **100.00** | **70.00** | **9.98** | **9.98** | |

**(अक्षरी रुपये नऊ लक्ष अठ्ठयान्नव हजार फक्त)**

## अटी व शर्ती

1. सदर कामाची/योजनेची अंमलबजावणी आपल्या प्रशासकीय विभागाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचना/निकषानुसारच करण्यात यावी तसेच शासन स्तरावर मंजुर केलेल्या कामाची व्दिरुक्ती होणार नाही व सदरीचे काम अनुज्ञेय असल्याची खात्री करुनच सदर काम अनुज्ञेय असल्यासच कामास सुरुवात करावी.

2. या आदेशान्वये वितरित करण्यात आलेला निधी चालु आर्थिक वर्ष सन 2018-19 अखेरीस अखर्चित राहिल्यास किंवा व्यपगत झाल्यास त्याची सर्व कार्यान्वयीन जबाबदार राहील. सदरील कामावर तांत्रिक मान्यता/प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेतच खर्च करावा जास्तीच्या खर्चाची कार्यान्वयीन जबाबदार राहील.

3. या योजनेसाठी/कामासाठी प्रस्तूत अंदाजपत्रकास आवश्यक असलेल्या तांत्रीक बाबीची तसेच शासनाने ठरवून दिलेल्या निकषाची पुर्तता करण्याची जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

4. पद निर्मिती किंवा पद भरतीबाबत कोणतीही मान्यता या आदेशान्वये देण्यात आलेली नाही.

5. या योजनेतंर्गत घेण्यात येणाऱ्या कामाची गुणवत्ता राखण्याची जबाबदारी संबधित कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

6. या योजनेतील गैरव्यवहार, लेखा आक्षेप, लोकलेखा समिती, विधीमंडळ कामकाज इ. बाबीसाठी संबंधित कार्यान्वयीन यंत्रणा व त्यांचा मंत्रालयीन प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

7. आवश्यक असलेल्या कामांबाबत निविदा मागविणे, स्वीकृत करणे व खरेदी बाबतचे सर्व अधिकार प्रचलित पध्दतीनुसार राहतील. रु.3.00 लाखांवरील कामांसाठी ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा.

8. अंदाजपत्रकातील दराबाबत विभागाच्या तरतूदीचे अनुपालन झाले असल्याबद्दलची खात्री करुन घेण्यात यावी. राज्य निवडणुक आयोगाने वेळोवेळी निवडणुका संदर्भातील आचार संहितेचे निर्गमित आदेश विचारात घेवून योग्य ती कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात यावी.

9. प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दरांचे वर्णन / दर / दरपृथःकरण / रक्कम /दर पृथःकरणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक ईतर बाबी तांत्रीक मान्यता प्रदान करण्यास सक्षम असलेल्या अधिकायांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात या कार्यालयाचे / शासनाचे कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही.

10. प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेच्या अधिन राहूनच खर्च करण्यात यावा. तसेच सदरील सामुग्री/साहित्य /कामे अन्य कोणत्याही निधीमधून घेण्यात आली नाही याची खात्री करावी.

11. उपरोक्त योजनांचा त्रयस्थ यंत्रणेमार्फत मुल्यमापन करण्यात येवू शकते तेव्हा या योजनेतंर्गत होणा-या खर्चाचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवण्यात यावा आणि दरमहा 5 तारखेपूर्वी योजनेच्या आर्थिक व भौतिक प्रगती अहवाल या कार्यालयास सादर करावा.

12. या योजनेतील कामावरील खर्च योजनेपुढे रकाना क्र.7 मध्ये नमूद लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

प्रति,

जिल्हा शल्य चिकित्सक,
जिल्हा सामान्य रुग्णालय, परभणी

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी

प्रत - माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव

1. महालेखापाल नागपूर - 2
2. जिल्हा कोषागार अधिकारी, परभणी
3. उपसंचालक, आरोग्य सेवा व परिमंडळ, औरंगाबाद
4. निवड नस्ती

स्वा/-
जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन समिती, परभणी